# Pimpri Chinchwad Police Commissionerate

**प्रेसनोट** **दि ०4/०३/२०२१**



प्रेसनोट

जा.क्र.पोउआ/वाहतुक/नियोजन/१००७/२०२१ पिंपरी चिंचवड शहर दिनांक- ०४/०३/२०२१

हिंजवडी वाहतूक विभाग हद्दीतील चांदणी चौक उड्डाणपुल व रस्ते विकसन कामात मुंबई बेंगळुर राष्ट्रीय महामार्गावरील पीलरचे काम चालु आहे.

ज्या अर्थी पिंपरी चिंचवड शहरातील वाहतूक सुरक्षित व सुरळीतपणे होणेकरीता, महाराष्ट्र शासन गृह विभाग क्र.एम. व्ही.ए. ०१९६/८७१/सी आर-३७/टीआरए-२,दिनांक २७/०९/१९९६चे नोटीफिकेशननुसार मोटार वाहन कायदा ११५,११६(१) (ए) (बी),११६(४) आणि ११७ अन्वये मला प्राप्त झालेल्या अधिकाराचा वापर करुन सुधीर हिरेमठ (भा.पो.से), पोलीस उप आयुक्त, वाहतुक, पिंपरी चिंचवड शहर यापुर्वी काही निर्बंध असतील ते रद्द करण्यात येत असुन तात्पुरत्या स्वरुपात खालील प्रमाणे आदेश निर्गमित करण्यात येत आहे.

**हिंजवडी वाहतूक विभाग**

१.चांदणी चौक पुलावरुन कोथरुड व सातारा हायवेचे दिशेने जाणारा सर्व्हिस रस्ता वाहतूकीसाठी पुर्ण बंद करण्यात येणार आहे.

पर्यायी मार्ग १.भुगाव,एनडीए व कोथरुड रोडवरुन येणारी वाहतूक ही चांदणी चौक पुलावरुन पाषाणकडे जाणारे रोडवरील व्हीबा हॉटेल येथुन डावे बाजुस वळुन हायवेवरुन चांदणी चौक व साताराचे दिशेने इच्छित स्थळी जातील.

२.पाषाण व बावधन कडुन येणारी वाहतूक चांदणी चौक पुलावर न जाता ती वाहने व्हीवा हॉटेल येथे उजवीकडे वळुन हायवेवरुन चांदणीचौक व साताराचे दिशेने इच्छित स्थळी जातील.

तरी नागरिकांनी पर्यायी मार्गाचा वापर करावा. वरील प्रमाणे वरील वाहतुक बदलाबाबत वॉर्डन व वाहतुक कर्मचारी यांना सहकार्य करावे असे आवाहन पिंपरी चिंचवड शहर ,वाहतुक शाखा यांचे मार्फतीने करण्यात येत आहे.

Shiremath

(सुधीर हिरेमठ) भा.पो.से
पोलीस उप-आयुक्त,
वाहतूक शाखा,पिंपरी चिंचवड

प्रति,
जिल्हा माहिती व प्रसिध्दी अधिकारी,
नविन मध्यवर्ती इमारत, पुणे – ०१

प्रत:-

१)पोलीस निरीक्षक, प्रेसरुम, पोलीस आयुक्त कार्यालय, पिंपरी चिंचवड शहर.

२/- सदर प्रेसनोटच्या प्रती पत्रकारांना देवून, सदरची बातमी वर्तमानापत्रातून प्रसिध्द करण्याची विंनती करावी.

२)सहा. पोलीस आयुक्त, वाहतूक शाखा, पिंपरी चिंचवड शहर.

३) पोलीस निरीक्षक हिंजवडी वाहतूक विभाग पिंपरी चिंचवड शहर.

४) मे एन सी सी लिमिटेड

२/- सदर ठिकाणी वरील वाहतूक वळविणारे फलक बसविणेची कार्यवाही होणेस विनंती आहे.


PASHAN CONNECTOR DIVERSION PLAN
Road Blocked
Road Blocked
1 = PASHAN
BAVDHAN
2 = KOTHRUD
MULSHI
NDA
PASHAN
3 = PASHAN
BAVDHAN
KOTHRUD
WARJE
SATARA